MAHA VITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

संचालक (वित्त)/ 32161

दिनांक - 28/11/2013

## परिपत्रक

**विषय : पतसंस्था तसेच नागरी सहकारी बँकांकडून विज बिल वसूलीसाठी करण्यात आलेल्या कराराच्या अटींचा भंग होणे बाबत.**

ग्राहकांच्या सोयीसाठी महावितरणकडून शहरी तसेच ग्रामीण भागा मध्ये विविध पतसंस्था तसेच नागरी बँका यांना विज बिल भरणा केंद्रे उघडण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. सदर विज बिल भरणा केंद्रे ही ग्राहकांच्या राहण्याच्या ठिकाणापासून जवळ असल्यामुळे अशा ठिकाणी विज बिल भरणा करणे ग्राहकास सोयीचे ठरते. तसेच या कामासाठी ग्राहकाचा कमीत कमी वेळ खर्च होतो.

वरीलप्रमाणे विज बिल भरणा केंद्रे चालू करणेसाठी महावितरणकडून पतसंस्था तसेच नागरी बँकांसोबत विहीत नमुन्यामध्ये करार केलेले आहेत. परंतु असे निर्देशनात आले आहे की, काही पतसंस्था सदर कराराचे पालन करीत नाहीत व करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्राहकांकडून जमा केलेल्या विज बिल रकमेचा भरणा महावितरणच्या बँक खात्यावर केला जात नाही.

करारामध्ये अंतर्भूत करण्यात आलेल्या अटी व शर्ती नुसार पतसंस्था व नागरी बँका यांनी ग्राहकांकडून जमा केलेली रोकड रक्कम जमा केल्याच्या दिवशी अथवा दुस-या दिवशी महावितरणकडून नेमूण देण्यात आलेल्या बँक खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. सदर अटीचे पालन काही पतसंस्थाकडून केले जात नसल्याचे आढळून आले आहे. अशा पतसंस्था ग्राहकांकडून जमा केलेली रोकड रक्कम आपल्या स्वतःच्या बँक खात्यामध्ये जमा करतात व सदर रक्कम महावितरणच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यासाठी स्वतःचा धनादेश (Cheque) जारी करतात. असेही निर्देशनात आले आहे की, अशाप्रकारचे धनादेश महावितरणच्या खात्यामध्ये जमा होणेसाठी विलंब लागतो व ही बाब कराराच्या विसंगत आहे.

क्षेत्रिय कार्यालयांना या व्दारे असे सूचित करण्यात येत आहे की, वरीलप्रमाणे ग्राहकांकडून जमा केलेल्या रोकड रक्कमेचा भरणा पतसंस्थानी करारातील अटी प्रमाणेच करावा यासाठी योग्य ती खबरदारी घेण्यात यावी. सदर बाबतीत कुठल्याही प्रकारची सूट देण्यात येऊ नये जेणेकरुन करारातील अटींचा भंग होईल. अशाप्रकारे कराराचा भंग झाल्याचे निर्देशनास आल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कंपनीच्या नियमानुसार शिस्तभंग कारवाई करण्यात येईल तसेच संबंधित पतसंस्था / नागरी सहकारी बँक यांचेडील विज बील वसुलीचे काम काढून घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

वरील सूचनांची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी.

**संचालक (वित्त)**

**प्रत सविनय सादर :**
मा.व्यवस्थापकिय संचालक, महावितरण, मुंबई

**प्रत सस्नेह रवाना :**
संचालक (संचलन)/(प्रकल्प), महावितरण, मुंबई

**प्रतः**

१. कार्यकारी संचालक (वाणिज्य) / (प्रकल्प), महावितरण, मुंबई.
२. प्रादेशिक कार्यकारी संचालक - १/२/३, पुणे/कल्याण/नागपुर
३. सर्व मुख्य अभियंता परिमंडळ.
४. मुख्य महाव्यवस्थापक (सां.ले.)/(सां.वि.)/(अं.ले.)/(मा.प्र.), प्रकाशगड, मुंबई.
५. सर्व अधिक्षक अभियंता सं व सु मंडळ कार्यालये.
६. सर्व कार्यकारी अभियंता सं व सु विभागीय कार्यालये.

Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

D:\GM(F&A)\CIRCULARS\Circular on coll from LINE MEN.docx

Prakashgad, Plot No. G-9, Bandra (E), Mumbai - 400 051. ☎ (P) 26472912 (O) 26474211 ● Fax : 26479941
Hongkong Bank Bldg., M. G. Road, Fort, Mumbai - 01. ☎ (P) 22650796 (O) 22619100 ● Fax : 22676194
E-mail : df@mahadiscom.in ● Website : www.mahadiscom.in